नवाकाळ शब्दकोडे-९८



आडवे शब्द – १. अचानक आलेल्या प्रसंगी योग्य निर्णय घेण्याची क्षमता ५. शंभर अपराध भरल्यावर कृष्णाने याचा वध केला ८. अननुभवी, पोरसवदा ११. मारला गेलेला १२. मोठेपणा १३. पिठी साखरेचा एक प्रकार १५. चक्र १७. वैदिक लग्नात अग्नीभोवती सात फेरे घेण्याचा विधी २१. आजोबा २२. लहान मूल २४. थेट २६. यश, साफल्य २८. आपला, निकटचा ३०. ओशाळगत ३२. दुराचार, अनैतिक मार्ग ३४. लुबाडणूक ३५. प्रत्येक महिन्याला ३७. पथिक, पांथस्थ ३९. उदर ४०. चतूर ४२. कीचक, बांबू ४४. यंत्रातील खटका, धनुष्य ४६. चिन्ह, खूण ४८. मावशीच्या मुलांशी नाते ५१. पांढऱ्या रंगाचे कमळासारखे दिसणारे फूल ५३. आवड, पसंत ५४. कोर्टात वकिलांचे दालन, बंदुकीची दारू ५६. फुलातील रजःकण ५८. पातळ पदार्थ ५९. निरागस, निष्पाप ६०. लकवा, पक्षाघात ६२. अखंड, मध्ये न तुटलेले ६४. उजळणी, अभ्यास, प्रॅक्टिस ६६. जवळीक, घसट ६७. मचूळ, बेचव ६९. हनुमान, मारुती ७१. बोध, आकलन ७३. होऊन गेलेले ७४. कटकट, पीडा ७५. पारा ७६. गोंधळ ७८. पद्धत ७९. निगरगट्ट, निर्लज्ज ८१. कंड ८२. व्यक्ती ८४. द्रुतगतीने हालचाली करणारा ८६. सूर्य ८७अ. खोड, चटक ९०. अमोघ उपाय ९१. त्रास, छळ ९३. लगेच प्रत्युत्तर देणारा ९५. थैली ९६. घायाळ ९८. स्वच्छ ९९. मळखाऊ किंवा मातीच्या रंगाचे १०१. ज्वर १०३. मनीषा, इच्छा १०५. गुंड १०६. हर्ष, आनंद १०७. घरातील थोरला, ज्येष्ठ १०८. तानाजी मालुसरे यांची उपाधी १०९. झोका ११०. कोंबड्यांचे घर

उभे शब्द – १. विनोदी नाटकविशेष २. चिडलेला ३. घर, सदन ४. कालवा ६. पांढरे, सफेद ७. पार्वती, उमा ९. वेब्रंढब १०. परतफेड न केलेले कर्ज आणि व्याज १४. शांतता १६. क्षुधा, जेवणाची इच्छा १८. अब्रू, क्रेडिट १९. मूर्ख माणूस २०. धुंदी, नशा २१. जनक, वडील २३. चंगळ, वैपुल्य २५. सरकारी देणे, टॅक्स २६. नेहमी २७. गुंडाळी २८. पुण्यवान लोकांचे मरणोत्तर स्थान, देवलोक २९. धूम्र ३१. लाचार ३२. अश्व ३३. मंजूर ३५. कपटी, विश्वासघातकी ३६. चार खांबावर उभारलेली, जंगलात शिकारीसाठी केलेली बसायची जागा ३७. रेती ३८. सज्जन ३९. ख्रिस्ती धर्मगुरू ४१. माफी ४२. गावाची सीमा ४३. सागर ४४. छोटी खार ४५. तुच्छतेची वाणूक ४७. नाशपंत ४९. चुताता हरल्यावर पांडवांना झालेली शिक्षा ५०. सजावट ५२. उशीर, विलंब ५३. वर्तुळ ५५. पत्नी, भार्या ५७. जहाज ५९. छाया ६०. हळुवारपणे ६१. स्तंभ, यज्ञस्तंभ ६३. हत्ती ६५. पेरणीपूर्वी जमीन भाजणे ६६. युद्ध, लढाई ६८. सदरा ७०. मौज, बहार ७१. जेवायला न मिळणे ७२. वाळवंटात होणारा पाण्याचा आभास ७४. चिडचिड ७७. खरा अर्थ किराणा वस्तूंचा व्यापारी, प्रचलित अर्थ अव्यवस्थित वा गचाळपणाचे विशेषण ७८. चारशे ऐंशी कागद ७९. कोनाडा ८०. अस्थिर ८३. किरकोळ, नगण्य ८५. मजबूत ८७. कोवळी फांदी ८७ब. संमती, मैत्री होणे ८९. हिंदूंचा मोठा सण ९२. साखळी ९४. ज्याप्रमाणे ९५. कुटीर, पर्णकुटी ९७. प्रिय व्यक्ती एकत्र असणे ९९. मक्षिका १००. वाडगा, मोठी वाटी १०१. कागदाचा अखंड तुकडा १०२. कुशाग्र बुद्धी १०४. तात्पर्य १०६. मुक्त, उघड ●

नवाकाळ कोडे क्रमांक ९७ चे उत्तर

आडवे शब्द : १. कंस ३. ओतप्रोत ६. शस्त्रसंधी ९. तोहमत ११. बहकलेला १३. रंगीत १४. सारमेय १६. वर्सत १८. तातर २०. लकेर २२. दक्षता २३. मारक २४. परवड २६. नार २७. उपरा ३०. बाई ३१. चिंता ३२. वचन ३४. नजर ३६. मेजवानी ३९. कुळव ४१. सवड ४३. वणी ४४. पराक्रम ४६. दामोदर ४८. काळवीट ५०. काळ ५१. कसर ५३. कसबी ५४. मत ५५. राजपुत्र ५८. तळीराम ६०. वाटा ६१. सुगी ६२. दवाखाना ६३. लक्ष्य ६४. तगमग ६६. मार ६७. शान ६८. कढई ७१. त्वरा ७२. मन ७४. साळसूद ७७. डाकीण ७९. साद ८०. नवागत ८४. भरवसा ८६. मरवा ८७. गाडीवान ८८. धूलिवंदन ९०. उतराई ९२. अंमल ९४. पीत९५. माघार ९८. च्युत ९९. गर्क १००. पनीर १०१. रिता १०३. परस १०५. रिकीब १०६. कोयरी १०८. तटस्थ १०९. सहस्राक्ष ११०. गड्ड १११. टणत्कार

उभे शब्द : १. कंबर २. सह ३. ओले ४. तलाव ५. तरंत ६. शततारका ७. संसार ८. धीर ९. तीय १०. मडके १२. कटाक्ष १५. मेहरबानी १७. संगोपन १९. टक २०. लड २१. रमताराम २२. दरवळ २५. वई २८. राजस २९. राजवट ३३. चवदार ३५. रवका ३७. वाणी ३८. न्यारा ३९. कुमक ४०. उदक ४२. डळमळीत ४४. पळपुटा ४५. क्रय ४७. रसमलई ४९. वीतराग ५०. काजवा ५२. सत्यवान ५६. डेंगी ५७. पिनाक ५९. ममत्व ६१. सुर ६२. दशानन ६५. गराडा ६६. मान ६९. ढग ७०. मळभ ७२. मण ७३. मंदवासर ७४. ढंग ७६. सूर ७७. दव ७८अ. कीर्तिबंत ७९. सार ८१. बाह्यात ८२. तगाई ८३. गबाक्ष ८५. साधू ८६. मनगानी ८९. लिगी ९०. उर्वरित ९१. राजी ९२. अंतरिक्ष ९३. लगबग ९६. धार ९७. विरस १००. परीट १०२. ताट १०४. सह १०६. कोप १०७. क्षीर

डोंबिवलीमध्ये वृद्ध दाम्पत्य जगतेय अंधारमय जीवन

■ डोंबिवली

येथील पश्चिमेकडील देवीचा पाडा परिसरातील शिवसाई चाळीत राहणारे बाबुराव आणि स्मिता मांजरेकर हे आर्थिक अडचणीत असल्याने घरातील लाईट चे बील भरू शकलेले नाहीत. गेल्या एक महिन्याहून अधिक कालावधीपासून हे वृद्ध दाम्पत्य वीज कनेक्शन कापल्यामुळे अंधारात आपले जीवन घालवत आहेत.

या बाबत अधिक माहिती अशी की, बाबुराव मांजरेकर हे ७० वर्षाचे वृद्ध पत्नी स्मिता यांच्यासोबत चाळीतील छोटया घरात राहतात. बाबुराव यांची प्रकृती गंभीर असल्याने ते अंथरुणास खिळलेले आहेत. पत्नी स्मिता या आजूबाजूच्या परिसरात घरकाम करून पोटा-पाण्यापुरते पैसे कमवतात. गेल्या काही महिन्यापासून उत्पन्नाचे व्यवस्थित साधन नसल्याने या कुटुंबाची

लाईट बील १७ हजारापर्यंत पोहोचले

आर्थिक परिस्थिती एकदम कोलमडली आहे. अशातच गेल्या अनेक महिन्यापासून त्यांना घरातील लाईट बील भरता आले नाही. ही रक्कम १७ हजारापर्यंत पोहोचली. सदर बील भरण्याबाबत त्यांना वीज मंडळाकडून नोटीस प्राप्त झाली. अनेक प्रयत्न करूनही स्मिता मांजरेकर या केवळ तीन हजार रुपये भरू शकल्या. वीज अभियंता यांनी त्यांना किमान दहा हजार रुपये भरा अन्यथा वीज कापली जाईल अशी सूचना दिली. पण वीज बिलाची ही रक्कम भरण्यास मांजरेकर यांना शक्य न झाल्याने २१ जानेवारी रोजी मंडळाने त्यांच्या घरातील वीज कापली तेव्हापासून हे वृद्ध असहाय्य दाम्पत्य अक्षरशः अंधारात राहत आहेत. त्यांना मदत करायला कोणीही पुढे सरसावले नाही. आता त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री, डोंबिवली विभागाचे कार्यकारी वीज अभियंता आणि ठाणे पोलीस आयुक्त यांनाच थेट पत्र लिहिले आहे.

नवाब मलिकांना दिलासा! कोर्टाने केल्या त्यांच्या तिन्ही मागण्या पूर्ण

■ मुंबई

मनी लॉंड्रिंग प्रकरणात राष्ट्रवादीचे नेते आणि अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक यांना अटक आणि ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे. पण, आपल्याला घरचे जेवण आणि औषधी मिळावी अशी मागणी मलिक यांनी केली होती. ती मागणी हायकोर्टाने मान्य केली आहे. नवाब मलिक यांना ३ मार्चपर्यंत ईडीची कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यामुळे पुढील ६ दिवस त्यांचा मुक्काम हा ईडी कोठडीत राहणार आहे. मलिक यांनी काल मुंबई सत्र न्यायालयाकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या होत्या.

नवाब मलिक यांच्या तिन्ही मागण्या मुंबई सत्र न्यायालयाने मान्य केल्या आहेत. नवाब मलिक यांनी काल कोर्टात विनंती केली होती की, त्यांना ईडी कस्टडीत असताना घरचे जेवण देण्यात यावे तसंच तपासादरम्यान त्यांचे वकिलांना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात यावी आणि औषधी देण्याकरिता परवानगी देण्यात यावी या तिन्ही मागण्या केल्या होत्या.

काल या तिन्ही मागण्या मुंबई सत्र न्यायालयाने मान्य केल्या आहेत. त्यामुळे मलिक यांना कोठडीत घरचे जेवण मिळणार आहे. ईडीच्या चौकशी दरम्यान मलिक यांचे वकील उपस्थितीत राहणार आहे.

SBI

भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. वाद्गने सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथार्थाच्या पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेख(विलेखां) सह / विधाय, उक्त भाग/ बॉण्डसे यथार्थाचे नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिभिन्नी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी ती दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलॉटिना असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११००५५ (ईमेल आयडी: sbi.igr@alotalnt.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिभिन्नी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

अनु क्र.	कोलियो क्र.	धारकाचे नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक पासून	प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत	विभिन्न क्रमांक पासून	विभिन्न क्रमांक पर्यंत
१	०२३३४९१३	साधना आर्य सुदर्शन कुमार पिपलानी	५००	११९१०७	१९९१०७	७४४२७५८८१	७४४२७५९८०
२	०००६२४१४	भगवान सिंह	२५०	४८५४५	४८५४५	७३८५०१३५२१	७३८५०१३७७०
३	०७९१३९६२	भगवान सिंह	४००	२३२६३२	२३२६३२	७४६२००२१७१	७४६२००३३७०
४	०७५१११४४७	रोहन सिंह	१४०	६३१९४९९	६३१९४९९	८०६०३३०१८८	८०६०३३०१२४७
५	००८४७३९५	के रोचर	३०	८१२२२	८१२२२	७९२३९९७४१	७९२३९९७४७०
६	०७०७२४६०	ओह के घिपीया सेट्ठी	५००	११३८४२	११३८४२	७४०३१८१६६१	७४०३१८२०६०
७	०५१०८०७३	कमला नारण	५००	२०२६४८	२०२६४८	७४४८७१५३४१	७४४८७१५८४०
८	०२१२१७०८	नीना खंडेलवाल उमा खंडेलवाल	५००	११८७३८	११८७३८	७४०७८५२४८१	७४०७८५२९८०
९	०२५२१७३०	सुधीर गोरखनाथ सुद्रिक	१००	१९८६३०	१९८६३०	७४४६५१९२२१	७४४६५१९७२०
१०	००८१९६२३	सुशील कुमार सिन्हा अंजना सिन्हा	३०	६७२८४	६७२८४	७३८९५९९७७१	७३८९५९९८००
११	०००८७११०	डी विमला एन एन राव	५३०	५७१६४	५७१६५	७३८७०३२२०१	७३८७०३२७३०
१२	००८७३५७४	दावतुरी सोटेश्वर राव डी सिव पार्वती	८२०	८९८८४	८९८८५	७३९५१९०४६१	७३९५१९१२८०

वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.

स्थळ: मुंबई
दिनांक: २५.०२.२०२२

समभागांची संख्या: ४७००
स.प्रमाणपत्रांची संख्या: १४

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)

प्रिंटींग मिस्टेक! पश्चिम बंगालचे विधानसभा अधिवेशन रात्री २ वाजता

मुंबई- राज्यपाल आणि सरकार यांच्यात समन्वय नसल्यास काय घडू शकते हे गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र अनुभवतोय. मात्र पश्चिम बंगाल मध्येही तसाच प्रकार सुरु असून प्रशासनाच्या एका प्रिंटींग मिस्टेकमुळे राज्यपालांनी चक्क रात्री दोन वाजता विधानसभेचे अधिवेशन बोलावले आहे. पश्चिम बंगालचे राज्यपाल जगदीप धनकड आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यात मतभेद आहेत. त्यामुळे राज्यपाल धनकडं हे सरकार किंवा प्रशासन यांच्याकडून चुका झाल्यास त्याबाबत कडक भूमिका घेतात. पश्चिम बंगाल विधानसभेचे अधिवेशन ७ मार्च पासून सुरु होणार आहे. याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीतील प्रस्ताव राज्यपालांकडे पाठवण्यात आला होता त्यात चुकून २ पी एम ऐवजी २ ए एम अशी प्रिंटींग मिस्टेक झाली.

५५ किलो गांजा मुंबईत जप्त केला

कल्याण- अमली पदार्थांची खरेदी विक्री करणे कायदेशीर गुन्हा असतानाही चोरट्या मागनि गांजा, ड्रग्जसारखे विविध अमली पदार्थांची खरेदी विक्री सुरु असते. दरम्यान भुवनेश्वरवरुन मुंबईकडे येणाऱ्या सुपर फास्ट एक्स्प्रेसच्या वातानुकुलीत बोगीतून तब्बल ५५ किलो गांजा ज्याची किंमत ५ लाख ५३ हजार रुपये इतकी आहे, तो जप्त करण्यात आला आहे. कल्याण आरपीएफ आणि कल्याण रेल्वे पोलिसांनी ही कारवाई केली आहे. हा गांजा आणणाऱ्या सम्राट बाबुराव पात्रा, संजू अहमद गाजी आणि अजगर अली बहादूर खान या तिघांन पोलिसांनी अटक केली आहे.

सभापतीपदी अपक्ष नगरसेवकाची निवड

■ मुरबाड प्रतिनिधी

मुरबाड नगरपंचायतीच्या विषय समितीच्या सभापती निवडीमध्ये केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांच्या निकटवर्तीय भाजप उमेदवारांच्या विरोधात निवडून आलेल्या बंडखोर अपक्ष उमेदवार दिक्षिता वारे यांना पाणी पुरवठा व जलनिसारण समितीचे सभापतीपद देण्यात आल्याने कपिल पाटील यांच्या जखमेवर मीठ चोळले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. तसेच मुरबाड नगर पंचायतीच्या नाम निर्देशित सदस्य म्हणून भाजप तर्फे नरेश जाखोटिया व शिवसेनेतर्फे अर्जुन शेळके यांची निवड करण्यात आली त्यामुळे निवडणुकीत पराभूत होऊनही अर्जुन शेळके स्वीकृत नगरसेवक बनल्याने त्यांचे ही अभिनंदन होत आहे. नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे यांनी शेळके यांना पराभूत केले होते परंतु शिवसेना नेतृत्वाने त्यांना संधी दिली आहे तर भाजपचे बंडखोर उमेदवार जुगलकिशोर जाखोटिया यांना शह देण्यासाठी त्यांचे चुलत भाऊ नरेश जाखोटिया यांना संधी दिल्याचे बोलले जाते

मुरबाड नगर पंचायतीच्या आज झालेल्या सभेत विविध विषय समितीच्या सभापतींची निवड करण्यात आली या वेळी स्थायी समिती सभापतीपदी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे यांची निवड करण्यात आली तर सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी संतोष चौधरी स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती भभापती नम्रता जाधव पाणी पुरवठा व जलनिःसरण समिती सभापती दिक्षिता वारे महिला व बालकल्याण समिती सभापती उप नगराध्यक्ष मानसी देसले व उप सभापती स्नेहा राजन भोईर नाम निर्देशित सदस्य अर्जुन कथोड शेळके शिवसेना व नरेश रामविलास जाखोटिया भाजप यांची निवड करण्यात आली.

प्रवीण राऊतांच्या बेनामी संपत्तीवर ईडीचे छापे

» पान १ वरून रियल इस्टेट व्यवसायात त्यांचे मोठे नाव आहे. मात्र गोरेगाव येथील एका भूखंडाच्या बोगस एफ एस आय प्रकरणात तसेच मनी लॉन्डरिंगमध्ये त्यांना ईडीने अटक केली होती. शिवाय पी एम सी बँक घोटाळ्या मधेही त्यांचा सहभाग आहे . त्यांच्या पत्नी माधुरी राऊत आणि संजय रावूत यांच्या पत्नी वर्षा राबूत यांचे व्यावसाईक संबंध असल्याचे यापूर्वीच उघडकीस आले असून २०१० मध्ये वर्ष राबूत यांनी प्रवीण राबूत यांच्याकडून ५५ लाख रुपये घेतले होते या प्रकरणी चौकशीही झाली होती आणि म्हणूनच आताच्या धाडीत प्रवीण राबूत यांची जी १ हजार कोटींची बेनामी संपती उघडकीस आली आहे त्यात संजय राबूत यांची काही इन्व्हेलमेंट आहे का याचा ईडी तपास करीत आहे.

मागील सरकारमध्ये भाजपसोबत होतो याचं दुःख वाटतं

» पान १ वरून

शेतकऱ्यांचा मोर्चा आला होता. या मोर्चाला बदनाम करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यांच्या हाती लाल झेंडे असल्याने त्यांना नक्षलवादीदेखील संबोधले. त्या सरकारमध्ये आम्ही होतो. त्याचे दुःख वाटते. काही चुकीचे निर्णय घेण्यात आले होते, असेही आदित्य यांनी म्हटले.

कोरोना काळात उत्तर प्रदेशातील अनेकजण मुंबईत अडकले होते. या बांधवांची महाराष्ट्रात शिवसेनेने काळजी घेतली असंही आदित्य ठाकरे म्हणाले. तसंच यावेळी त्यांनी केंद्र सरकारवरही तोफ डागली. ते म्हणाले की, मुंबईतील उत्तर प्रदेशमधील कामगारांना गावी जाण्यासाठी केंद्राने अडवणूक केली. स्पेशल ट्रेनची मागणी दोन महिन्यांनी मान्य करण्यात आली. मात्र, या स्पेशल ट्रेनसाठीही तिकीट आकारणी करण्यात आली. यासाठी महाराष्ट्राने मुख्यमंत्री सहाय्य निधीतून मदत केली.

अखेर रशियाने युक्रेनवर जबरदस्त हल्ला केलाच

» पान १ वरून

इशारा देतच म्हटले की, या प्रकरणात कुणीही मध्ये पडू नये. जर मध्ये पडलात तर गंभीर परिणाम भोगावे लागतील. अशा स्थितीत युक्रेनच्या नागरिकांचे बळ वाढविण्यासाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष जेलेनस्की म्हणाले की, जगातील सर्व राष्ट्रांनी आम्हाला मदत करावी. रशियावर कठोर निर्बंध लादावेत. आम्ही रशियाशी लढत आहोत. युक्रेनच्या ज्या नागरिकाला लढायचे असेल त्याला शस्त्र पुरविले जाईल.

भारताने आजच्या हल्ल्यावर अत्यंत शांत प्रतिक्रिया देत चर्चे तून मार्ग काढावा इतकेच म्हटले. किंबहुना पंतप्रधान मोदींनी आज उत्तर प्रदेशातील प्रचाराची एकही सभा रद्द केली नाही. दिवसभराचा प्रचार पूर्ण करून त्यांनी रात्री संरक्षण खात्याची बैठक बोलावली. युक्रेनवर अचानक हल्ला झाल्याने अनेक भारतीय नागरिक व विद्यार्थी तिथे अडकून पडले आहेत. आज विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी गेलेले एअर इंडियाचे विमान अर्ध्या वाटेतून रिकामे परत आले. यापुढे या सर्वांची सुटका करण्याबाबत भारताला काहीतरी निर्णय घ्यावा लागेल. दरम्यान, आज सुरू झालेल्या युद्धामुळे जगातील शेअरबाजार कोसळले, तेल आणि इंधनाचे भाव कडाडले. येत्या काही दिवसांत जी ७, नाटो आदिंच्या बैठकीत काय घडते याकडे सर्वांचे लक्ष राहिल.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय ☎ २२०१६१७५
Email : presidency.ee@mahapwd.gov.in ✉ २२०१६१७३

ई -निविदा सूचना क्र.७६ सन २०२१-२०२२

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६१७५ /२२०१६१७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागविल आहेत. निविदा स्विकारल्याचा अथवा नाकारल्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम रु. लक्ष
१	आकाशवाणी आमदार निवास मुंबई इमारतीमधील विविध रुमची दुरुस्ती व रंगकाम करणे.	१७.६९
२	नविन विधानभवन मुंबई इमारतीच्या मागील बाजुस पॉलिकार्बोनेक फ्रिटचे नुतनीकरण करणे.	७६.६८
३	चर्चगेट मुंबई येथील आमवारी, विधावर्ली, मातर, केदार इमारतीच्या विविध सदनिकाचे नुतनीकरण करणे.	२९.९९
४	मलबार हिल मुंबई येथील वर्षा बंगला सेवक निवासस्थाने नुतनीकरण करणे.	२०.७८
५	मलबार हिल मुंबई येथील तोरणा बंगला सेवक निवासस्थाने नुतनीकरण करणे.	२१.६०
६	चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारत सदनिका ३७ दुरुस्ती व नुतनीकरण करणे.	२४.७५
७	हाजीअली मुंबई येथील शासकीय अधिकारी निवासस्थाने इमारत ६ ए प्रसाधनगृह फ्लोरींग किचन दुरुस्ती व रंगकाम करणे.	२२.६०
८	हाजीअली मुंबई येथील शासकीय अधिकारी निवासस्थाने इमारत १७ बी प्रसाधनगृह फ्लोरींग किचन दुरुस्ती व रंगकाम करणे.	२२.६०
९	ताडदेव मुंबई येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय पाण्याची टाकी व पंपरुम दुरुस्ती करणे.	१५.३०
१०	मंत्रालय मुंबई विस्तार व मुख्य इमारतीच्या विविध विभाग कार्यालय मंत्री दालने रंगकाम पॉलिशकाम करणे.	१७.६७
११	मंत्रालय मुंबई गार्डन गेट जवळील व्ही पी एम सी सिस्टीम साठी पोठा कॅबिन बसविणे.	११.०३
१२	मादाम कामा रोड मुंबई येथील मा. मंत्री महोदय यांचे सेवक निवासस्थाने आवारभिंत दुरुस्ती करणे.	२६.२०
१३	मादाम कामा रोड मुंबई येथील मा. मंत्री महोदय यांचे बंगला सी/८ येथे आवारभिंत दुरुस्ती करणे.	२१.९९
१४	उच्च न्यायालय विस्मार इमारत मुंबई येथील दरवाजे/ खिडक्या पाण्याची पाईपलाईन दुरुस्ती करणे व रंगकाम करणे.	११.६७
१५	बाझारगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील कार्यालय प्लास्टर रंगकाम करणे, पाण्याची पाईपलाईन दुरुस्ती करणे,	१३.२३

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २५.२.२०२२ ते दि. ११.३.२०२२ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १४.३.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचनेमध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिद्ध केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in

जा.क्र. इआव/निवि/१९९९
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

सही/-
(सी.टी. नाईक)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

दिनांक : २१/०२/२०२२ आरओसी-२०२१-२०२२/क्र-५/सी ४६८४